# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२४

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील महानगरपालिका क्षेत्रांमध्ये शहरांमधील जल वाहिन्यामधून मोठ्या प्रमाणात होत असलेली पाणी गळती

**(१) ४५५४१ (२५-०९-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानगरपालिका क्षेत्रांमध्ये जल वाहिन्यामधून मोठ्या प्रमाणात पाणी गळती होत असल्याचे माहे माहे एप्रिल २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पाणी गळती रोखण्यासाठी शासनाचे राज्य स्तरावर धोरण आखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.

माहे एप्रिल, २०२२ दरम्यान महानगरपालिका क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी गळती झाल्याचे निर्दशनास आलेले नाही, असे आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांनी कळविले आहे.

(२) व (३) दैनंदिन देखभाल व दुरुस्ती कामांतर्गत होणाऱ्या गळतीची दुरुस्ती त्वरीत संबंधीत महानगरपालिकेमार्फत करण्यात येते तसेच पायाभूत सुविधांची कामे सुरु असताना जलवाहिन्यांना आघात झाल्यास त्या सत्वर दुरुस्त केल्या जातात.

जलवाहिन्यामधून गळती झाल्याचे निदर्शनास आल्यास अथवा पाण्याचा कमी दाब याबाबत तक्रार प्राप्त होताच संबंधित पाणी गळती अन्वेषण विभागामार्फत अत्याधुनिक शास्त्रीय उपकरणाव्दारे जळवाहिन्यामधील गळती त्वरीत दुरुस्ती करुन पाणी पुरवठा सुरळीत केला जातो.

तसेच महानगरपालिकेमार्फत जुन्या व जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलण्याची कार्यवाही संबंधीत महानगरपालिकेकडून केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई महानगरपालिकेतील २९ हजार सफाई कामगारांना मालकी हक्काने घर देण्याबाबत

**(२) ४९५९१ (२७-०१-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेतील २९ हजार सफाई कामगारांना मालकी हक्काने घरे देण्याची घोषणा माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालकी हक्काने घरे देण्याबाबत व लाड-पागे समितीच्या सफाई कामगार विषयक धोरणाबाबत कार्यवाही करुन आतापर्यंत किती सफाई कामगारांना मालकी हक्काने घरे देण्यात आलेली आहेत,

(३) असल्यास, पोलिसांना १५ लाखात घरे देण्याच्या योजनेच्या धर्तीवर उर्वरित सफाई कामगारांना मालकी हक्काची घरे देण्याबाबत कोणती योजना आखण्यात आली आहे वा प्रस्तावित करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन विभागातील २७,९०० सफाई कामगार कार्यरत असून, त्यापैकी ५५१८ सफाई कामगारांना सेवाज्येष्ठतेनुसार सेवासदनिकेचे वाटप करण्यात आले आहे.

सदर सेवानिवासस्थानांचे आश्रय योजनेंतर्गत पुनर्विकास करण्याचे काम सुरु असून एकूण १२ हजार सेवासदनिका उपलब्ध होणार आहेत.

दिनांक २२ ऑक्टोबर, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे अशा सफाई कामगारांना सेवानिवृत्तीच्या वेळी किंवा सफाई कामगारांचा सेवेत असतांना मृत्यू झाल्यास अशा सफाई कामगारांच्या पात्र वारसास महानगपालिका / नगरपालिकेकडून मालकी हक्काने २६९ चौ. फुट चटई क्षेत्राची सदनिका मोफत देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, सदर निर्णयानुसार एमएमआरडी बिल्डींग नं. १०, वाशीनाका (दिनेशा बिल्डर) चेंबूर येथे सन २००९ साली एकूण ५० घरांचे वाटप करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

असे कोणतेही धोरण बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निश्चित झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नऱ्हे (जि.पुणे) येथील श्रीमती काशीबाई नवले रुग्णालयात रुग्णांना रजिस्ट्रेशन नंबरच्या माध्यमातून औषध खरेदीची सक्ती केली जात असल्याबाबत

**(३) ४९६६७ (१८-०१-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नऱ्हे (जि.पुणे) येथील श्रीमती काशीबाई नवले रुग्णालयात रुग्णांना रजिस्ट्रेशन नंबरच्या माध्यमातून औषध खरेदीची सक्ती केली जात असल्याचे माहे, मे २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयातून औषधे खरेदी न केल्यास रुग्णांनी इतरत्र रुग्णालयात उपचार घेण्याचा सल्ला ही रुग्णालय प्रशासनाने दिल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णांना बाहेरील मेडिकलमध्ये सवलतीच्या दरात औषधे मिळत असताना देखील नाईलाजास्तव त्याच मेडिकल मधून औषधे खरेदी करावी लागत असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधित रुग्णालयावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०२-२०२४) :** (१) व (२) अशा आशयाची तक्रार पुणे महानगरपालिकेकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) सह आयुक्त (औषध), अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांचेकडील दि.२९.०९.२०१५ रोजीच्या पत्रानुसार रुग्णालयाच्या मेडीकल स्टोअर मधुनच रुग्णांनी औषधाची खरेदी करावी अशी सक्ती खाजगी रूग्णालयांनी करू नये. रूग्ण व त्यांचे नातेवाईक कोणत्याही परवानाधारक औषध विक्रेत्याकडुन औषधाची खरेदी करू शकतात. अशा आशयाचे फलक रुग्णालयाच्या दर्शनी भागात लावणे बाबत सुचना करण्यात यावे असे कळविले होते.

त्या अनुषंगाने पुणे शहरातील सर्व खाजगी रुग्णालयांना आरोग्य खात्यामार्फत दि. ०९.१०.२०१५ चे पत्रान्वये फलक रुग्णालयाच्या दर्शनी भागात प्रर्दशित करणेबाबत लेखी सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष यांच्या मुंबईस्थित निवासस्थानावर झालेला हल्ला**

**(४) ५१०८३ (१९-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील सिल्व्हर ओक या निवासस्थानावर हल्ला करणाऱ्या १७५ बडतर्फ एसटी कामगारांना कामावर घेण्याचा निर्णय दि.०७.१०.२०२२ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री महोदयांनी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार मुदतीत कामावर हजर झाले नसताना सदर कामगारांची बडतर्फी मागे घेण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०३-२०२४) :** (१), (२), (३) व (४) सिल्व्हर ओक हल्ला प्रकरणी ११८ रा.प.कर्मचारी यांचेवर गावदेवी पोलीस स्टेशन येथे गुन्हे नोंदविण्यात आले. ११८ रा.प कर्मचारी अटकेत असल्याने, मा.मुंबई उच्च न्यायलयाने संपात सहभागी असलेल्या रा.प.कर्मचाऱ्यांना नियोजित कर्तव्यावर दि.२२.०४.२०२२ पर्यत किंवा तत्पूर्वी हजर होण्यासाठी दिलेल्या आदेशाचे पालन करु शकले नाहीत. सदर रा.प.कर्मचाऱ्यांना कामावर रुजू होण्यासाठी अथवा प्रकरणपरत्वे आवेदन दाखल करण्यासाठी सहानुभूतपूर्वक विचार करुन दि.२७.१०.२०२२ पर्यत मुदत देण्याची सुचना केली होती. त्यानुसार सदर कर्मचाऱ्यांना बडतर्फी / निलंबन प्रकरणी परिपत्रकीय सुचनांनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येऊन, तसेच कोणतेही कारवाई न झालेल्या कर्मचाऱ्यांनाही रा.प.सेवेत रुजू करुन घेतले आहे.

---

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**हवेतील प्रदूषणाची मोजमाप करणारी यंत्रणा बसविण्याबाबत**

**(५) ५२८७१ (२३-०१-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्यावतीने पनवेल महानगरपालिका हद्दीत कळंबोली वसाहत व तळोजा औद्योगिक वसाहत या दोन ठिकाणी जवळपास १ कोटी रुपये खर्च करुन हवेतील प्रदूषणाची मोजमाप करण्याची यंत्रणा १ वर्षांपूर्वी बसवण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून १ वर्षभरापूर्वी बसवण्यात आलेली ही यंत्रणा अद्यापही अंडरटेस्टिंगमध्ये असल्याने सदर यंत्रणेचा उपयोग हवामान प्रदूषण पातळी मोजण्यासाठी होत नसल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पनवेल महानगरपालिका हद्दीत हवेतून होणाऱ्या प्रदूषणाच्या मुद्दाने गंभीर स्वरुप प्राप्त केले असून इतकेच नव्हे तर हवेतून होणारे हे प्रदूषण रोखणारी यंत्रणा कार्यान्वित करण्यात प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रशासन पुर्णपणे अपयशी ठरले असून हवेतून होणाऱ्या प्रदूषणामुळे महानगरपालिका हद्दीतील रहिवाशांना विविध व्याधीचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पनवेल महानगरपालिका हददीत प्लॉट नं. १०, सेक्टर-०२ ई, कळंबोली तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, तळोजा या ठिकाणी सतत वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी केंद्र बसविण्यात आलेली असून ती कार्यान्वित आहे.

(३) उपायुक्त (पर्यावरण), पनवेल महानगरपालिका यांचे दि. २४.०२.२०२३ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्र व २९ गावामधील विभागात कार्यरत असलेल्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, पनवेल २ नवीन पनवेल, कळंबोली, खारघर व कामोठे या केंद्रात माहे जानेवारी २०२२ ते आजमितिस दमा विकार-९४ रूग्ण, क्षयरोग-१३५५ रूग्ण, छातीत दुखणे-१८४ रूग्ण, डोळयांचे विकार-८७ व निमोनिया-१०३ असे बाह्य रूग्ण विभागात उपचारार्थ आले होते. तसेच यामधील कोणतीही रूग्ण दगावलेला नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य अग्निशमन सेवा अकादमीचा पाठ्यक्रम पूर्ण करणाऱ्या उमदेवारांना**
**मुंबई अग्निशमन दलाच्या भरतीपासून वंचित रहावे लागल्याबाबत**

**(६) ५६५१९ (२४-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य अग्निशमन सेवा अकादमीच्या पाठ्यक्रमासाठी किमान उंची १६५ से.मी. असलेल्या उमेदवारांना प्रवेश देण्यात येत असताना मुंबई अग्निशमन दलाने अग्निशामकांची ९१० पदे भरण्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीत १६५ से.मी. ऐवजी १७२ से.मी. किमान उंचीची अट घातल्याने राज्य अग्निशमन सेवा अकादमीचा पाठ्यक्रम पूर्ण करणाऱ्या उमदेवारांना मुंबई अग्निशनम दलातील भरतीपासून वंचित रहावे लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वी २०११ मध्ये मुंबई अग्निशमन दलाच्या सेवेकरीता घेण्यात आलेल्या भरतीमध्ये उमेदवारांची उंची किमान १६५ से.मी. असल्याच्या अटीत अचानक ७ से.मी. वाढवून ती किमान १७२ से.मी. करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, यासंदर्भात राज्य अग्निशमन सेवा अकादमीचा पाठ्यक्रम पूर्ण करणाऱ्या उमदेवारांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री महोदय तसेच मुंबई महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशामक भरतीतील निकषांबाबत फेरविचार करून निकषात बदल करण्यासाठी शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०२४) :** (१) १७२ सें.मी. उंचीच्या निकषात बसणाऱ्या उमेदवारांनी राज्य अग्निशमन सेवा अकादमीतील पाठ्यक्रम पूर्ण केलेला असल्यास, अशा उमेदवारांना मुंबई अग्निशमन दलातील नोकरीत प्राधान्यक्रम म्हणून प्रमाणपत्र चाचणीत २५ गुण अधिकचे दिले जातात.
(२) अनेक वर्षांतील अनेक प्रकारच्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींना तोंड देतेवेळी जास्त उंची असलेल्या कर्मचाऱ्यांची सक्षमता प्रत्यक्ष दुर्घटनेवर कामकाजासाठी उपयुक्त ठरते असे अनुभवास आल्याने सन २००९ मध्ये उमेदवारांची भरती करत असतांना निवडीसाठीचे शैक्षणिक व शरिरीक निकष, सर्व आवश्यक प्रक्रिया व मंजुरीसह निश्चित करण्यात आले. तसेच निवड प्रक्रिया सुलभ होण्यासाठी व उमेदवारांची संख्या नियंत्रित ठेवण्यासाठी सदर निकष निश्चित करण्यात आले आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये कंत्राटी तत्वावर असलेल्या सहाय्यक आरोग्य आशा सेविकांना कायमस्वरुपी नियुक्ती देण्याबाबत**

**(७) ५६५७५ (२४-०४-२०२३). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये लसीकरणासाठी लसटोचकांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे मात्र, लसीकरण कार्यक्रमांमध्ये अत्यंत महत्वाची भूमिका बजावणाऱ्या ४३४ सहाय्यक आरोग्य सेविकांची कायमस्वरुपी पदे मागील ३ वर्षांपासून रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२३ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासनाकडून प्रत्येक दिवसाला २ याप्रमाणे एकुण ४१४ शिबिरांचे आयोजन करण्यात येते, महानगरपालिकेने निर्धारित केलेल्या निकषानूसार १० हजार लोकसंख्येसाठी १ सहाय्यक परिचारिका तर १० हजार लोकसंख्येसाठी ३ आशासेविका आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य कार्यक्रमांमध्ये लसीकरण, कुटुंब नियोजन, गर्भवती महिला संदर्भातील आरोग्य मोहिमेचा पाठपुरावा करण्याचे काम ६० टक्के इतकी असते त्यामुळे कंत्राटी नाहीतर पूर्णवेळ वैद्यकीय कर्मचाऱ्यांची अधिक गरज असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येत असलेल्या रुग्णांना सुसज्ज आरोग्य सेवा पुरविण्यासाठी कंत्राटी पध्दतीवर नियुक्त करण्यात आलेल्या सहाय्यक आरोग्य सेविकांची कायमस्वरुपी पदे भरण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०२४) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये व कोविड लसीकरण केंद्रांमध्ये कोविड लसीकरणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सन २०२१-२२ करिता कंत्राटी पध्दतीने परिचारीकांची (लसटोचक) नियुक्ती करण्यात आली होती.

तसेच, शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार गोवर उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर बाह्य लसीकरण सत्रासाठी प्रतिसत्र मानधनावर लसटोचक अशी नेमणूक करण्यासाठी विविध स्थानिक वृत्तपत्रांत दिनांक २१.१२.२०२२ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि सदर जाहिरातीस प्रतिसाद न लाभल्यामुळे कंत्राटी लसटोचकांची नियुक्ती करण्यात आलेली नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गत सहाय्यक आरोग्य सेविका असे पद अस्तित्वात नाही. तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रांमध्ये साह्यकारी परिचारीकांची (प्रसविका) या संवर्गाची ४२१ पदे रिक्त आहेत.

(२), (३) व (४) सदर साह्यकारी परिचारीकांची (प्रसविका) ४२१ रिक्त पदे भरण्याकरिता दिनांक ९ जानेवारी, २०२३ मध्ये सर्व स्थानिक वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीस अनुसरुन प्राप्त अर्जांची छाननी व पडताळणी पूर्ण झालेली आहे. तदनुसार उमेदवारांना पात्र / अपात्र करुन प्रस्ताव मंजुरीकरिता सादर करण्यात आला असून, मंजुरी प्राप्त झाल्यानंतर उमेदवारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित पध्दतीने नियुक्ती देण्यात येणार आहे.

कंत्राटी तत्वावरील कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी नियुक्ती देण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कोणतेही धोरण नाही. तथापि, कंत्राटी तत्वावरील लसटोचक, साह्यकारी परिचारीका (प्रसविका) या पदाची अर्हता धारण करीत असल्यास ते अर्ज करण्यास पात्र राहतील व गुणवत्तेनुसार त्यांची निवड करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उंबरखेड (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील रस्त्याच्या बांधकामाबाबत

**(८) ५७८१२ (२५-०४-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंबरखेड (ता.तिवसा, जि.अमरावती) येथे रस्त्यांचे बांधकाम करण्यासाठी खनिज निधीतून निविदापूर्वी निधी मंजुर करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दि. १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०२४) :** (१) होय.

(२) मा.लोकप्रतिनिधी यांनी भौतिक पायाभूत सुविधा या घटकांतर्गत उंबरखेड (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी निविदापूर्वी निधी मंजुर करण्याची विनंती केली होती. सद्यस्थितीमध्ये भौतिक पायाभूत सुविधा या घटकांतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठान, अमरावती येथे निधी उपलब्ध नाही. त्यामुळे जिल्हा खनिज प्रतिष्ठान, अमरावती अंतर्गत निधी उपलब्ध झाल्यास मा.लोकप्रतिनिधीनी सुचवलेली कामे नियामक परिषदेच्या पुढील बैठकीमध्ये ठेण्यात येतील .

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बोईसरच्या (जि.पालघर) समुद्रात रसायनमिश्रित पाणी सोडल्याने पाणी दुषित झाल्याबाबत

**(९) ५७८६४ (२६-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसरच्या (जि.पालघर) समुद्र किनाऱ्यापासून सुमारे ५०० मीटर अंतरावर कारखान्यांतून मोठया प्रमाणात रसायनमिश्रित पाणी कोणतीही प्रक्रिया न करता समुद्रात सोडण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समुद्रात रसायनमिश्रित पाण्याच्या लाटा निदर्शनास येत असल्याप्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित कारखान्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०२-२०२४) :** (१) हे खरे नाही, तथापि, दि.२४ डिसेंबर, २०२२ रोजी नवापूर येथील अरबी समुद्रामध्ये काळसर रंगाचा तवंग दिसत असल्याचे जिल्हाधिकारी, पालघर यांना तटरक्षक दल यांच्यामार्फत कळविण्यात आले होते.

(२) व (३) सदर घटनेच्या अनुषंगाने दि.२४.१२.२०२२ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पाहणी करण्यात आली होती.

सदर पाहणीदरम्यान सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील सांडपाण्याचा रंग कमी करण्यासाठी वापरण्यात येणारे PAC या प्रक्रिया केमिकलचा साठा संपल्यामुळे सीईटीपीमधून एम.आय.डी.सी. सम्प क्र. ५ येथे पुढील विल्हेवाटीसाठी विनाप्रक्रिया सांडपाणी सोडण्यात आल्यामुळे तेथील समुद्रात काळया रंगाचा तवंग निदर्शनास आले होते. त्यामुळे दि.०२.०३.२०२३ रोजीच्या अंतरिम आदेशानुसार सदर सांडपाणी प्रक्रिया केंद्र चालविणाऱ्या मे.टीइपीएस-सीइटीपी, तारापूर, ता.जि.पालघर यांची रु.५ लक्ष इतकी बँक हमी जप्त करण्यात आली आहे. तसेच टीईपीएस-सीईटीपी संचालक

मंडळाला दि. १०.०५.२०२३ रोजीच्या निर्देशांन्वये जल प्रदुषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ अंतर्गत खटला का दाखल करण्यात येवू नये याबाबत विचारणा करण्यात आली असून त्याबाबत पुढील कार्यवाही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सुरू आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. ०४.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये TEPS-CETP कडून सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्राचा ताबा घेणे व स्वत: अथवा एखाद्या बाह्य तज्ञ संस्थेमार्फत त्यांचे कामकाज पाहणे याबाबतचे निर्देश महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला दिले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर (जि.चंद्रपूर) शहरात विविध उद्योगांद्वारे प्रदुषण विभागाच्या नियमांची केलेली पायमल्ली

**(१०) ५८५९२ (२६-०४-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर (जि.चंद्रपूर) शहरातील विविध उद्योगव्दारे प्रदुषण विभागाचे नियम डावलत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे प्रदुषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार वाढत असलेल्या प्रदुषणावर आळा घालण्याकरिता कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.

चंद्रपूर शहराच्या सभोवतालच्या उद्योगांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे वेळोवेळी भेट देऊन पाहणी करण्यात येते. पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने सदर उद्योगांवर वेळोवेळी योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येते.

चंद्रपूर शहरातील प्रदूषण कमी करण्याकरिता चंद्रपूर शहर कृती आराखड्यानूसार National Clean Air Program (NCAP) अंतर्गत कार्यवाही करण्यात येते.
(२) चंद्रपूर शहरामध्ये विविध उद्योगांवर खालीलप्रमाणे कारवाई केलेली आहे :-

१. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे. दुर्गापूर खुल्या खाणीची रू.१०.०० लक्षची बँक हमी दि.२९/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जप्त केलेली आहे.
२. मे. चंद्रपूर सुपर थर्मल पॉवर स्टेशन, चंद्रपूर या उद्योगाने फ्लाय ॲश हाताळणी व विल्हेवाट शास्त्रोक्त पद्धतीने न केल्यामुळे सदर विद्युत केंद्राला दि. ०४/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहे.
३. मे. धारीवाल इन्फ्रास्टक्चर्स लि., महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, ताडाली, जि. चंद्रपूर या उद्योगाची पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने उद्योगास दि. १४/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.
४. मे. गोपाणी आयर्न ॲण्ड पॉवर (इं) प्रा. लि. व मे. ग्रेस इंडस्ट्रीज लि., या उद्योगांच्या भेटीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने दोन्ही उद्योगांना अनुक्रमे दि. ०५/०२/२०२१ व दि. १०/०२/२०२१ रोजी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहे.

५. मे. सिद्धबली इस्पात प्रा. लि. एमआयडीसी ताडाली, ता. जि. चंद्रपूर या उद्योगाविरूद्ध प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने भेटी दरम्यान आढळलेल्या त्रुटीनूसार उद्योगास दि. १७/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहे.

६. धुरांड्यातील उत्सर्जनाचे पृथ:करण अहवाल विहीत मर्यादेपेक्षा जास्त आढळल्यामुळे चंद्रपूर फेरो अलॉय प्लांट या उद्योगाची रू. २.५० लक्षची बँक हमी दि. ०२/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये जप्त करण्यात आलेली आहे.

७. पडोली ते घुग्घूस रोडवर अस्तित्वात असलेल्या सर्व कोळसा डेपोंना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने बंद करण्याबाबतचे निर्देश या कार्यालयातर्फे बजाविण्यात आले होते

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई येथे माहुल, अंबापाडा आणि चेंबूर येथे प्रदूषण पसरल्याने राष्ट्रीय हरित लवादाने कंपन्यांवर दंड ठोठवल्याबाबत

**(११) ६१३१७ (२५-०४-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील माहुल, अंबापाडा आणि चेंबूर येथे प्रदूषण पसरवल्याचा ठपका ठेवत राष्ट्रीय हरित लवादाने बीपीसीएससह इतर ४ कंपन्यांवर २८६ कोटी रुपयांचा दंड ठोठावला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दंडाची रक्कम वसूल करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्यानुंषगाने भविष्यात पर्यावरण हानी कमी करण्याच्या दृष्टीने सदर कंपनीना सुचना देण्यात आल्या आहेत का व केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) मा. राष्ट्रीय हरिद लवाद यांनी दिलेल्या आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालय यांच्याकडे मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. (रिफायनरी) व मे. हिदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. (रिफायनरी), मे. एजीस लॉजिस्टीक लि. व मे.सिलॉड कंटेनर लि. या उद्योगांकडुन याचिका दाखल करण्यात आली होती. त्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. राष्ट्रीय हरिद लवाद यांनी दिनांक १३.०८.२०२० रोजी दिलेल्या आदेशाला स्थगिती देण्यात आलेली आहे.

(३) मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. (रिफायनरी) व मे. हिदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. (रिफायनरी), मे. एजीस लॉजिस्टीक लि. व मे. सिलॉड कंटेनर लि. या उद्योगांना दि. ०१/०८/२०१९ रोजी आदेश देण्यात आले होते. त्यानूसार संबंधीत उद्योगांनी आवश्यक सुधारणा केल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कसबा-बावडा (जि.कोल्हापूर) मार्गावरील पंचगंगा नदीपात्र प्रदुषित झाल्याने मासे मृत होत असल्याबाबत

**(१२) ६१५४७ (२५-०४-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसबा-बावडा (जि.कोल्हापूर) मार्गावरील पंचगंगा पुलाखालील नदीपात्रातील प्रदूषणात मागील दोन वर्षापासून सातत्याने वाढ होत असून वारंवार मासे मृत होण्याच्या घटना घडत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार नदीतील प्रदुषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०२-२०२४) :** (१) प्रश्नाधिन विषयाबाबतचे वृत्त स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाले होते.
(२) सदर वृत्ताच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान सुर्वे बंधारा वळीवडे येथे मोठया प्रमाणात मासे मृत झाल्याचे व नदी पात्रातील पाणी हिरवट रंगाचे होऊन तेथे उग्र वास येत असल्याचे निदर्शनास आले होते. तसेच सुर्वे बंधाऱ्याच्या वरील बाजूस अंदाजे १ ते १.५ कि.मी. वर वळीवडे व गांधीनगर भागातील घरगुती सांडपाणी पंचगंगा नदी पात्रात मिसळत असल्याचे आढळून आले होते.

सदर पाहणीदरम्यान दोषी आढळून आलेल्या पाणी पुरवठा अभियंता (Hydraulic Engineer), कोल्हापूर महानगरपालिका व पर्यावरण अभियंता, मे. कोल्हापूर शुगर मिल, मे.राजाराम सहकारी साखर कारखाना, यांना दिनांक ०६/०१/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीसा व मे. राजाराम सहकारी साखर कारखाना यांना दिनांक २५/०१/२०२३ रोजी प्रस्तावित आदेश बजावण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत ग्रामपंचायत, वळीवडे व गांधीनगर यांना दिनांक २३/०१/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. तसेच इचलकरंजी महानगरपालिकेला दिनांक १९/०१/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस व दिनांक ३०/०१/२०२३ रोजी कोल्हापूर महानगरपालिकेला प्रस्तावित आदेश बजावण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**तारापूर (जि.पालघर) येथे जलप्रदुषण करणाऱ्या पर्यावरण संरक्षण संस्थेवर कारवाई करण्याबाबत**

**(१३) ६१८३२ (२४-०४-२०२३). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तारापूर (जि.पालघर) पर्यावरण संरक्षण या संस्थेनेच प्रदूषित रसायनांवर कोणतीही प्रक्रिया (कलर रिमुव्हल) न करता रसायनयुक्त सांडपाणी समुद्रात सोडल्याने समुद्र काळवंडला असल्याची बाब तटरक्षक दलानी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास केलेल्या हवाई पाहणीत काढलेल्या छायाचित्रातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तारापूर पर्यावरण संरक्षण संस्थेविरोधात जलकायदा, १९७६ अंतर्गत कारवाई करण्याचा प्रस्ताव एमपीसीबीने (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ) शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुंषगाने जलप्रदुषण करणाऱ्या तारापूरमधील पर्यावरण संरक्षण संस्थेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) प्रश्नाधिन घटनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत एम.आय.डी.सी तारापूर येथे सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र चालविणाऱ्या मे.टी.इ.पी.एस–सी.ई.टी.पी. यांना दिनांक २६.१२.२०२२ रोजी प्रस्तावित आदेश देण्यात आले आहेत. तसेच दिनांक ०४.०२.२०२३ रोजी सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्राचा मे.टी.इ.पी.एस–सी.ई.टी.पी. यांच्याकडून ताबा घेणे व स्वत: अथवा एखाद्या बाह्य तज्ञ संस्थेमार्फत त्यांचे कामकाज पाहणे याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला निर्देश दिले असून त्याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील पवई तलावात मोठया प्रमाणावर होत असलेले प्रदूषण रोखण्याबाबत

**(१४) ६३६१० (२५-०४-२०२३). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवई तलाव, अंधेरी (पूर्व) मुंबई येथे असून या तलावात मोठया प्रमाणावर प्रदूषण होत असल्याने प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने ८ तज्ञ सदस्यांची समिती गठीत केली असून समितीने अहवाल माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर अहवालात प्रदूषण रोखण्यासाठी कोणत्या शिफारशी केल्या आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अहवालातील शिफारशीची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०२-२०२४) :** (१) मा.हरित लवादाने दिलेल्या निर्देशानुसार पवई तलाव प्रदूषणाच्या अनुषंगाने आठ (८) सदस्यांची संयुक्त समिती गठित करण्यात आली आहे.

(२) व (३) सदर समितीने केलेल्या पाहणीदरम्यान दिलेल्या सूचनेनुसार पवई तलावाचे प्रदूषण रोखण्याची अल्प व दीर्घ मुदतीच्या योजना तयार करण्याचे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात आले होते. त्यानुसार मुंबई महानगरपालिकेने सदर योजना तयार करण्याकरिता मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि.यांची नियुक्ती केली असून पुढील कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

मा.लवादाच्या निर्देशानुसार गठित संयुक्त समितीचा अंतिम अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मु.पो.कशेळी (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील खाडी लगत कांदळवनावर ब्रास डेब्रिज फेकल्याबाबत

**(१५) ६५३३६ (२८-०८-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.कशेळी (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील खाडी लगत सर्व्हे क्र.१९८ या जमिनिवर मुंबई उच्च न्यायालयाने कांदळवन संरक्षण व संवर्धनाचे स्पष्ट आदेश दिल्यानंतरही भूमाफियांनी खाडीपासून ५० मीटर बंदी क्षेत्रात एम.एच.०४. एच.वाय.९९५६, एम.एच.०४. एच.डी.८०१०, एम.एच.४३. एच.वाय.४४८७, एम.एच.०४. ए.ई.८०२० या ४ डंपरने १४ हजार ब्रास डेब्रिज या कांदळवनावर फेकल्याची तक्रार तहसीलदार, श्री.अधिक पाटील व खारबावचे मंडळ अधिकारी श्री.योगेश भोजने यांनी डंपर चालकाविरोधात केली व डंपर नंबर सह नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नारपोली पोलिसांनी या गंभीर प्रकाराची व तक्रारीची दखल घेऊन डंपरचे जे नंबर तहसीलदार व मंडळ अधिकाऱ्यांनी दिले आहेत याबाबत तपास करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात डंपर नंबर बनावट वा खोटे असल्यास संशयितांच्या विरोधात कारवाई करण्याकरिता तसेच डेब्रिज फेकण्याचे वा अन्य कोणतेही अतिक्रमण करु नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) कांदळवन संधारण घटक मुंबई विभागाच्या ताब्यात असलेल्या कांदळवन क्षेत्रात डेब्रीज फेकण्याचे व अतिक्रमण होवू नये म्हणून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

१.कांदळवन संवर्धनासाठी सन २०१३ मध्ये मुंबई कांदळवन संधारण घटक या विभागाची स्थापना झाली आहे.
२.कांदळवन क्षेत्रात अतिक्रमण होऊ नये म्हणून आतापर्यंत चारकोप, कांदिवली , एरंगळ , मालवणी, गोराई, माहुल, आणिक, कशेळी , मंडाळे, कांजूरमार्ग, विक्रोळी व वाशी येथे जवळपास ६.५० कि.मी.ची संरक्षण भिंत/ चेन्लिंग फेन्सिंगचे काम करण्यात आले आले आहे.
३.कांदळवन क्षेत्रात निगरानी ठेवण्यासाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बसविण्याचे शासनाने निर्णय घेतला आहे. त्यामध्ये सल्लागार नेमणूक झाली असून त्यांचा Detail Project Report तयार असून पुढील कार्यवाही चालू आहे.
४.कांदळवनाबदल लोकांमध्ये जनजागृतीसाठी कांदळवन कक्षामार्फत विविध जनजागृती कार्यक्रम घेण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ५५ नदीपट्टे धोकादायक पातळीवर असल्याच्या अहवालाबाबत**

**(१६) ६६०४६ (२९-०८-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) जल गुणवत्ता व्यवस्थापन विभागाने ‘पोल्युटेड रिव्हर स्ट्रेचेस फॉर रिस्टोरेशन ऑफ वॉटर क्वालिटी’ हा अहवाल तयार केला असून यामध्ये देशभरातील ६०३ नद्यांचे विश्लेषण करण्यात आले असून त्यापैकी सर्वाधिक ५५ प्रदूषित नदीपट्टे राज्यात असल्याचे दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात बुलढाणा जिल्ह्यातील नद्यांचा सुद्धा समावेश असून राज्यांतील अन्य नद्याही मोठया प्रमाणावर प्रदूषित झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रदूषित नद्यांमध्ये कोणकोणत्या नद्यांचा समावेश आहे, तसेच संबंधित प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार उक्त नद्यांच्या प्रदूषणास जबाबदार असलेल्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) प्रदूषित नदी पट्टयांमध्ये

- प्राथ्यमता क्र.१ मिठी नदी
- प्राथम्यता क्र.२ मध्ये भीमा, मुळा, मुठा व पवना नदी
- प्राथ्यमता क्र.३ चंद्रभागा, इंद्रायणी, कुंडलिका, नीरा, मुळा-मुठा, पेढी, सीना नदी
- प्राथ्यमता क्र.४ बिंदुसारा, घोड, गोदावरी, काळू, कान्हान, कोलार, कोयना, कृष्णा, मांजरा, मोरना, पाताळगंगा, पेनगंगा, उरमोडी, वेण्णा, वैनगंगा नदी
- प्राथ्यमता क्र.५ अंबा, भातसा, बुराई, बोरी, दारणा, गिरणा, गोमाई, हिवारा, कान, मोर, पांझरा, पेलार, पूर्णा, रंगावली, सूर्या, तानसा, तापी, तितूर, उल्हास, वेल, वाघूर, वर्धा, वेणा नदी या नद्यांचा समावेश आहे.

(४) मा.लवादाने दिलेल्या निर्देशांनुसार शासनाने दि. १३.१२.२०१८ रोजी नदी पुनरूत्थान समिती गठीत करण्यात आली असून मा. हरित लवाद यांच्या निर्देशांनुसार सदर समितीमार्फत राज्यातील ५३ प्रदूषित नद्यांचे कृती आराखडे तयार करून केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर करण्यात आले आहेत. सदर कृती आराखड्यांची अंमलबजावणी विविध विभागांमार्फत करण्यात येत आहे.

- राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या वार्षिक अंदाजपत्रकात २५ % रक्कमेची तरतूद सांडपाणी व नागरी घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि.११/०९/२०१९ रोजीच्या पत्रान्वये जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ अन्वये निर्देश प्रदान केलेले आहेत.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना कलम २४, २५, २६, सोबत ४३, ४४ जल (प्रदुषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ अंतर्गत खटला दाखल करणेबाबतची नोटीस प्रदान करण्यात आली आहे.
- मेहकर नगर परिषदेच्या कार्यक्षेत्रामधून निर्मित होणारे ७.५ दशलक्ष लीटर घरगुती सांडपाणी हे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या विनाप्रक्रिया पैनगंगा नदीत मिसळत असल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मेहकर नगर परिषदेस दिनांक ०५/०९/२०१७ रोजी कलम २५, २६, ३३ अ, सोबत ४१ (२अ) ४३, ४४ जल (प्रदुषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ कलम ३१ अ, सोबत ३७ हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ तसेच पर्यावरण (सरंक्षण) कायदा, १९८६ कलम १५ आणि घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत खटला दाखल करणेबाबतची नोटीस देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई मनोरी खाडीमध्ये खारफुटीवर राडारोडा टाकण्यात येत असल्याबाबत

**(१७) ६६०५९ (३१-०८-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मनोरी खाडीमध्ये महाराष्ट्र नागरी मंडळातर्फे रोरो जेट्टीचे काम सुरू असून पर्यावरण दृष्ट्या संवेदनशील असलेल्या खारफुटीची तक्रार मा.मुख्यमंत्री कार्यालय व महाराष्ट्र नागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाकडे दिनांक २३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरातील खारफुटीमुळे हा भाग पर्यावरण दृष्ट्या संवेदनशिल म्हणून जाहीर करण्यात आलेला असतांना याच खारफुटीवर आता राडारोड्याचे ढीग टाकले जात असल्याची तक्रार स्थानिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरण शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही,

(२) हे खरे नाही,

सदर रोरो जेट्टीच्या बांधकामास दि.१०.०४.२०१७ रोजी SEIAA ने सि.आर.झेड परवानगी दिलेली आहे. त्याचप्रमाणे सदरचे काम करण्यास मा.उच्च न्यायालयाने देखील दि.२५.०२.२०१९ रोजी परवानगी दिलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे येथे नाविन्यपूर्ण योजनेच्या नावाखाली समाजकल्याण विभागात झालेला गैरव्यवहार

**(१८) ६६२८८ (१२-०९-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम**

**शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे समाजकल्याण विभागात नाविन्यपूर्ण योजनेच्या नावाखाली आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुणे येथील समाजकल्याण सहाय्यक आयुक्त यांनी जिल्हा नियोजन समितीकडून मागासवर्गीयांसाठी नाविन्यपूर्ण योजनेतंर्गत ३ कोटी ३० लाख ९१ हजार ३५० रुपयांचा निधी मंजूर करुन घेत तो महिला आर्थिक विकास मंडळाला दिला आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, भात आणि बिगरभात क्षेत्रासाठी महिला सबलीकरण कीट अंतर्गत अवजारांचा पुरवठा करणारी कृषी विभागाची योजना असतानाही नाविन्यपुर्ण योजनेतंर्गत ही योजना दाखवून सदर आयुक्तांनी नियोजन समितीची दिशाभूल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बाजारभावापेक्षा चढ्या दराने अवजारांची खरेदी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच सांडपाणी पुनर्वापर प्रकल्प खरेदी, सीसीटीव्ही सारख्या व इतर योजनांमध्ये गैरव्यवहार झाले असल्याचे निष्पन्न झाले असून यामध्ये शासनाची आर्थिक फसवणूक झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, जिल्हाधिकारी, पुणे यांनी या आर्थिक गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी चौकशी समिती घटित केली आहे, हे ही खरे आहे काय ,

(७) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०२-२०२४) :** (१) सदर प्रकरणी वृत्तपत्रांमध्ये छापलेल्या बातमीच्या आधारे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत चौकशी सुरू आहे.

(२) होय.

(३), (४), (५), (६) व (७) अवजारे खरेदी प्रक्रिया महिला आर्थिक विकास महामंडळ, पुणे या कार्यालयामार्फत राबविण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत चौकशी सुरू आहे.

---

## भुगांव व भूकम (ता.मुळशी, जि.पुणे) या गावातील रामनदीमध्ये होणारे प्रदूषण रोखण्याबाबत

**(१९) ६६४१३ (३१-०८-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुगांव आणि भूकुम (ता.मुळशी, जि.पुणे) या गावातून वाहणारी रामनदीमध्ये स्थानिक बांधकाम व्यावसायिकांकडून प्रदूषण करण्यात येत असल्यामुळे भुगांव व भूकुम ग्रामपंचायतीनी प्रदुषण नियंत्रण मंडळ व मा.हरीत लवादाकडे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मु.पो. बावधन खुर्द ( पुणे शहर ) येथील राम नदीपात्रात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर बांधकामे व हजारो टन राडारोडा टाकला असल्याने नदी पात्राची वहन क्षमता कमी झाल्याने संबंधितांवर तातडीने कारवाई करावी अशी लेखी तक्रार बांधकाम विकास विभाग झोन क्र.३ चे उप अभियंता श्री. निवृत्ती उत्तळे यांनी हिंजवडी पोलीस स्टेशनला दिल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भुकूम येथील रामेश्वर ते पाषाण सोमेश्वर असा १२ ते १३ किलोमीटर पर्यंत असणाऱ्या नदीत बेकायदेशीर बांधकामे व टाकण्यात आलेल्या राडारोडा विरोधात पुणे जलबिरादरी ने सन २०१० मध्ये केलेले उपोषण, किर्लोस्कर वसुंधरा रामनदी पुनरुज्जीवन समितीने दिलेल्या अहवालातील उपाययोजनांची अमलबजावणी पुणे महानगरपालिका प्रशासनाकडून झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बावधन क्षेत्राच्या सन १८९० च्या नकाशात या नदीचा उल्लेख ४८ मीटर रुंदी ची नदी असा करण्यात आला आहे. तसेच पुरातन काळात भुकूम येथील रामेश्वर ते पाषाण सोमेश्वर असा १२ ते १३ किलोमीटर पर्यंत प्रदूषित असलेली रामनदी आता संपूर्ण प्रदूषित झाली आहे, हे खरे आहे काय,

(५) तसेच भुकूम, भूगाव व बावधन आणि पाषाण परिसरात नागरीकीकरण होत असताना बांधकाम व्यावसायिकांनी नियम डावलून सांडपाणी तसेच मैलापाणी रामनदीत सोडले जात असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली करुन, रामनदीमध्ये होणारे प्रदुषण रोखण्याकरिता कार्यवाही करण्यासह या प्रकरणातील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०२-२०२४) :** (१) प्रश्नाधिन विषयाबाबतची तक्रार माहे - जानेवारी, २०२३ दरम्यान महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाली होती. तसेच याबाबत मा. राष्ट्रीय हरित लवाद यांचेकडे मुळ अर्ज क्रमांक ५२/२०२३ ही याचिका दाखल करण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) भूकूम, भूगाव व बावधान आणि पाषाण परिसरात नागरिकीकरण होत असून, अनेक बांधकाम प्रकल्प या भागात विकसित होत आहेत. तथापि, कोणत्याही बांधकाम प्रकल्पाचे घरगुती सांडपाणी विनाप्रक्रिया प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष नदीत सोडण्याची परवानगी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत देण्यात येत नाही.

(४) व (५) प्रश्नाधिन विषयाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २५/०१/२०२३ रोजी करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान पुणे महानगरपालिकेची घरगुती सांडपाणी वाहून नेणारी नलिका फुटल्याने विनाप्रक्रिया सांडपाणी रामनदीत मिसळत असल्याचे निर्दशनास आले होते.

त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत अधिक्षक अभियंता (मल नि:स्सारण), पुणे महानगरपालिका यांना दिनांक ३०/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सांडपाणी वाहून नेणारी नलिका त्वरीत दुरुस्त करुन सदर पाण्याचा विसर्ग थांबविण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच पुणे महानगरपालिका यांचे हद्दीतील नागरीवस्तीमधून निर्माण होणाऱ्या घरगुती सांडपाण्याची प्रक्रिया यंत्रणा जायका या संस्थेच्या मदतीने उभारणे प्रस्तावित असून, सदरची संयत्रणा माहे डिसेंबर-२०२५ पर्यंत पुर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### दक्षिण मुंबईतील सुकलाजी स्ट्रीट येथील महानगरपालिकेच्या वसाहतींची झालेली दुरवस्था

**(२०) ६६६०६ (२७-०८-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील सुकलाजी स्ट्रीट येथील महानगरपालिकेच्या १५० टेनामेंट्स वसाहतींची दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसाहतीत राहणारे रहिवाशी आपला जीव मुठीत घेऊन वास्तव्य करीत असून, सदर वसाहतीची दुरुस्ती करण्यासाठी रहिवाश्यांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर वसाहतीत राहणारे रहिवाशी आपला जीव मुठीत घेऊन राहत आहेत हे खरे नाही. तथापि त्यांनी दुरुस्तीची मागणी केली आहे हे खरे आहे.
(३) सदर इमारतींचा संरचनात्मक परिक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, सद्य:स्थितीत प्रस्तावास प्रशासन (स्थायी समिती) व प्रशासन (महानगरपालिका) यांची मंजूरी प्राप्त झाली आहे. तसेच कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आला असून, सदर दुरुस्ती काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदपूर (जि.लातूर) शहरातील अंबाजोगाई रस्त्यावरुन टाकावू वस्तू वाकी नदीच्या पुलावर टाकल्याने नदी पात्रातील पाण्याचे झालेले प्रदूषण**

**(२१) ६६९२७ (३१-०८-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदपूर (जि.लातूर) शहरातील अंबाजोगाई रस्त्यावर मांस व मच्छी तसेच इतर टाकावू वस्तू वाकी नदीच्या पुलावर टाकले जात असल्याने सदरहू घाण नदीच्या पात्रात जावून पाणी प्रदूषित होत असल्याचे दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रदूषित पाणी पिण्यासाठी वापरण्यात येत असल्यामुळे तेथील नागरीकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार मांस, मच्छी व टाकावू वस्तू वाकी नदीच्या पुलावर न टाकता त्याची इतरत्र व्हिलेवाट लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२४) :** (१) प्रश्नाधिन विषयाबाबतची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाली होती. सदर तक्रार आवश्यक त्या कार्यवाहीकरिता नगरपरिषद, अहमदपूर यांचेकडे पाठविण्यात आली होती.
(२) वाकी नदीच्या पाण्याचा वापर पिण्याकरिता करण्यात येत नाही.
जिल्हा आरोग्य अधिकारी, लातूर यांचेकडून प्राप्त माहितीनुसार नदीकाठच्या गावामध्ये रहिवाशांच्या आरोग्यावर विपरित परिणाम झाल्याबाबतच्या तक्रारी त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाली नसल्याचे कळविले आहे.
(३) वाकी नदी पुलावर अंबाजोगाई रोड या ठिकाणी मांस व मच्छी विक्रेते विक्री करण्यासाठी बसत होते व मांस व मच्छी विक्री केल्यानंतर निघणारा कचरा त्याच ठिकाणी टाकत होते. जास्त कचरा निदर्शनास आल्यामुळे अहमदपूर नगर परिषद मार्फत वाकी नदी पुलावर बसणारे मांस व मच्छी विक्रेत्यांवर बंदी घालण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपालिका येथील प्रशासकाच्या मनमानी कारभाराबाबत**

**(२२) ६६९७३ (१२-०९-२०२३). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपालिका येथे प्रशासक असून त्यांच्या मनमानी कारभारामुळे सामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्यामुळे संतापाचे वातावरण पसरले असल्याचे माहे मार्च व एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मनमानी कारभार करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०२४) :** (१) सांगली जिल्हयातील सांगली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका आणि इस्लामपूर, विटा, तासगांव, आष्टा, जत, पलूस व शिराळा नगरपरिषदा / नगरपंचायतीचा कार्यकाल संपुष्टात आल्यामुळे तसेच आटपाडी नगरपंचायत नवनिर्मित असल्यामुळे त्या ठिकाणी प्रशासकाची नेमणूक करण्यात आलेली आहे.

(२) व (३) प्रशासकांच्या मनमानी कारभारामुळे सामान्य नागरीकांना नाहक त्रास होत असल्याची कोणतीही बाब जिल्ह्यात आढळून आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिवहन मडळांतील कामगारांचे भविष्य निर्वाह निधी उपदानाचे ८०० कोटी रुपये शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(२३) ६७१९७ (३०-०८-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळातील कामगारांचे भविष्य निर्वाह निधी उपदान, ग्रॅच्युटीचे व एसटी बँकेचे मिळून रुपये ९६० कोटी शासनाकडे थकीत असल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना आणि कर्मचाऱ्यांच्या प्रदीर्घ संपामुळे आर्थिक घडी विस्कटलेल्या राज्य परिवहन महामंडळाला सावरण्यासाठी पुढील ४ वर्षापर्यंत कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे तत्कालीन राज्य शासनाकडून सांगण्यात आले होते, मात्र गेल्या दहा महिन्यापासून राज्य शासनाकडून अपुरा निधी येत असल्याने कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी उपदानाची रुपये ८०० कोटींची देणी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ११ महिन्याच्या कालावधीत सुमारे १६०० कोटी रुपयांची तुट आल्याचे महामंडळाकडून सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच राज्य परिवहन महामंडळाच्या संपकाळात वेतनासाठी चार वर्षे निधी देण्याचे त्रिसदस्यीय समितीने शासनाच्यावतीने मा.न्यायालयात मान्य केले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन शासनाने तफावतीची रक्कम राज्य परिवहन महामंडळाला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-११-२०२३) :** (१) व (२) नाही.

रा.प.महामंडळाकडुन कोणत्याही कर्मचाऱ्यास भविष्य निर्वाह निधी व उपदानाची देणी प्रलंबित नाही. त्रिसदस्यीय समितीने शिफारस केल्यानुसार व दि.१०.०४.२०२३ च्या शासन निर्णयानुसार रा.प.महामंडळास दरमहा वेतनासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. निधीनिधीच्या उपलब्धतेनुसार सदरची प्रलंबित देणी अदा करण्यात येत आहे.
(३) सन २०२२-२३ च्या प्राथमिक लेख्यानुसार महामंडळास रु.१०५३.२८ कोटी तोटा आहे.
(४), (५) व (६) मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.२१६९९/२०२१ प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार दि.०८.११.२०२१ च्या शासन निर्णयान्वये मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीने त्यांच्या अहवालात "महामंडळाची सद्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता, राज्यशासनाने अर्थसंकल्पीय तरतूद करुन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी किमान पुढील ४ वर्षासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा." अशी शिफारस केली आहे. सदर अहवालास राज्य मंत्रीमंडळाच्या दि.२३.०३.२०२२ रोजीच्या बैठकीत मान्यता दिलेली आहे.

तसेच शासन निर्णय दिनांक १०.०४.२०२३ अन्वये, "रा.प.महामंडळाच्या दरमहा उत्पन्नातून इंधनावरील, वाहनांच्या देखभाल दुरुस्तीवरील व वेतनावरील खर्च भागविण्यासाठी दरमहा जेवढया रक्कमेची तूट निर्माण होत आहे, तेवढी रक्कम शासनाकडून अर्थसहाय्य म्हणून उपलब्ध करुन देण्यात येईल." अशा सूचना प्रसारित करण्यात आल्या आहेत.

---

## लोढा हेरिटेज (डोंबिवली पूर्व) (जि.ठाणे) येथील चंद्रेश वास्त एफ हाऊसिंग को-ऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये अनधिकृतरित्या बांधकाम होत असल्याबाबत

**(२४) ६७८८८ (२५-०८-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोढा हेरिटेज (डोंबिवली पूर्व) (जि.ठाणे) येथील चंद्रेश वास्त एफ हाऊसिंग को-ऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये अनधिकृतरित्या बांधकाम झाल्याबाबत अनधिकृत बांधकामे कायदेशीर प्रक्रिया (DPL) पार पाडून निष्कासनाची कारवाई करण्याबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून जाणूनबुजून दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यासाठी दिनांक ११ एप्रिल व २३ मे, २०२३ रोजी आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करुन निष्कासनाची कार्यवाही करण्यात येणार होती परंतु, विविध कारणे देऊनही निष्कासनाची कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन उक्त अनधिकृत बांधकामाला जाणीवपूर्वक कारवाई न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द तसेच सदरचे अनधिकृत बांधकामे निष्कासन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-०३-२०२४) :** (१) संबंधित सोसायटीने बांधकाम (शेड) नियमित करणेकामी नगररचना विभागाकडे यापुर्वी प्रस्ताव सादर केला होता.

त्यास अनुसरून इमारतीच्या छतावरील पावसाळी शेडसाठी नगररचना विभागाने परवानगी दिलेली आहे.

उर्वरित नकाशा व्यतिरिक्त शेड, सोसायटीचे कार्यालय व शौचालयावर दि.०४.०७.२०२३ रोजी निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे.

(२) व (३) दि.११ एप्रिल व २३ मे, २०२३ रोजी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण कण्यात आली होती. परंतु स्थानिक पोलीस बंदोबस्त उपलब्ध न झाल्याने, सदर दिवशी निष्कासनाची कारवाई करता आली नाही.

तदनंतर दि.०४.०७.२०२३ रोजी निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई पुणे महामार्गावर खादयपदार्थाच्या किंमतीमध्ये दरवाढ**
**करुन प्रवाशांची लुट होत असल्याबाबत**

**(२५) ६७९८१ (३०-०८-२०२३). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पुणे महामार्गावर एक्सप्रेस हायवेचे कारण देत ट्रक टर्मिनला थांब्यावर एसटी प्रवाशांची खादय पदार्थाच्या किंमतीतून मोठया प्रमाणात आर्थिक लूट होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे एसटी महामंडळाने ठरवून दिलेल्या मूळ दरापेक्षा चहा नाश्ताच्या दरात तिप्पट दरवाढ करुन विक्री सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन एसटी प्रवाशांची होणारी आर्थिक लूट थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०३-२०२४) :** (१) व (२) नाही.

(३) व (४) रा.प.बसेसचे अधिकृत हॉटेल थांबा येथे रा.प.प्रवाशांना रु.३०/- मध्ये चहा व नाष्टा देणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

---

**नांदेड जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींना महानेटच्या माध्यमातून**
**इंटरनेट सेवा जोडणी करुन देणेबाबत**

**(२६) ६८१६९ (२३-०८-२०२३). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गावस्तरावरील शासकीय कामकाज सुलभ व्हावे म्हणून ग्रामपंचायतीपर्यंत इंटरनेट कनेक्टिव्हिटी पोहोचण्याचा निर्णय घेतला असून राज्यस्तरावर महानेट उपक्रम राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्ह्यातील ११ तालुक्यात ९५७ ग्रामपंचायतीमध्ये इंटरनेट पोहोचवण्याचे उद्दिष्ट होते परंतू या उपक्रमाचा नांदेड जिल्ह्यात बोजवारा उडाला असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींना महानेटच्या माध्यमातून इंटरनेट सेवा जोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०३-२०२४) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) हे खरे नाही, महानेट-I (भारतनेट-II) अंतर्गत ११ तालुक्यात ९५५ ग्रामपंचायती समाविष्ट असून, सध्यस्थितीत ६७१ ग्रामपंचायतीमध्ये इंटरनेट जोडणी पूर्ण झाली आहे. तसेच, उर्वरित ग्रामपंचायतीना इंटरनेट जोडणी पोहचविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) नाही, विशेष सहाय्यता निधी योजने अंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी करण्याकरीता भारत संचार निगम लिमिटेड (BSNL) ला FTTH (फायबर टू द होम) जोडणी करण्यासाठी जबाबदारी दिली आहे. सदर योजने अंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीमधील सरकारी संस्था, आस्थापना/शासकीय कार्यालयांना ५ FTTH (फायबर टू द होम) द्वारे जोडणी प्रस्थापित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धारावी (मुंबई) राजीव गांधीनगर येथील जागा महानगरपालिकेच्या अत्यावश्यक नागरी प्रकल्पासाठी संपादीत करण्यात येत असल्याबाबत**

**(२७) ६८३४९ (३१-०८-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धारावी (मुंबई) राजीव गांधीनगर येथील झोपडीधारकांना महानगरपालिकेच्या जी उत्तर विभागातर्फे राहत्या घराचे पुरावे सादर करण्याच्या नोटीस माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिल्यामुळे तेथील झोपडीधारकांमध्ये भितीचे व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राजीव गांधीनगरमधील जागा महानगरपालिकेच्या अत्यावश्यक नागरी प्रकल्पासाठी संपादीत करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेऊन येथील झोपडीधारकांना कागदपत्रे जमा करण्याचा कालावधी वाढवून देण्यासह त्यांच्या पुनर्वसनाबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०२४) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मिठी नदी विकास प्रकल्प हा महत्वपूर्ण प्रकल्प म्हणून घोषित करण्यात आला असून, मिठी नदी रुंदीकरण प्रकल्पात बाधित होणाऱ्या झोपडीधारकांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३१४ अन्वये ६७१ नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

तथापि, नोटीस बजावल्यामुळे झोपडीधारकांमध्ये भितीचे व चिंतेचे कुठलेही वातावरण निर्माण झालेले नाही अथवा अशा स्वरुपाची कुठलीही तक्रार / निवेदन बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाही.
(२) हे खरे आहे.
(३) नोटीस प्राप्त झालेल्या झोपडीधारकांमार्फत पात्रता ठरविण्यासाठीची कागदपत्रे बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर करण्यात आली असून, त्याअनुषंगाने परिशिष्ट-२ करण्यात येऊन ते राजीव गांधी नगर, धारावी येथे प्रदशित करण्यात आले आहे व पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

सदर कागदपत्रे सादर करण्याचा कालावधी वाढवून देण्याबाबतची मागणी अद्यापपर्यंत कोणत्याही झोपडीधारकाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस करण्यात आलेली नाही.

तसेच, नियमानुसार पात्र झोपडीधारकांच्या पुनर्वसनाची व्यवस्था बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाळुंगी (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) नदीवरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(२८) ६८५२७ (३०-०८-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाळुंगी (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) नदीवरील खचलेल्या पुलाच्या दुरुस्तीचे काम प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पुलाच्या दुरुस्तीचे काम प्रलंबित असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन सदर पुलाच्या कामाची वर्क आर्डर काढून दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०२-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) संगमनेर नगरपरिषदेस शासन शुद्धीपत्रक दि.१४.०६.२०२३ अन्वये वैशिष्ट्यपुर्ण योजना (सन २०२१-२२) अंतर्गत "संगमनेर नगरपरिषद, ता. संगमनेर, जि.अहमदनगर हद्दीतील पंपिंग स्टेशन साईनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील म्हाळुंगी नदीवर पुलाचे बांधकाम करणे" या कामास रु.४.५० कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

सदर कामाकरीता नगरपरिषदेच्या १०% हिश्यासह एकूण रु.५,७६,६८,०५५/- इतक्या रकमेच्या कामास जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दि.०१.११.२०२३ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने, संगमनेर नगरपरिषद स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील खाणबाधित गावातील योजनांसाठी असलेल्या खनिज निधीबाबत**

**(२९) ६८५३७ (२९-०८-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खनिज उत्खननामुळे बाधित होणाऱ्या गावांच्या विकासासाठी संकलीत करण्यात येणाऱ्या खनिज निधीतून राज्याच्या मागील पाच वर्षात २ हजार २२६ कोटी रुपये विविध योजनासाठी वितरीत करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, मात्र अद्याप या निधीत ९८८ कोटी रुपये शिल्लक आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील निधी खनिज क्षेत्रातील गावातील विकास कामासाठी तातडीने वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०३-२०२४) :** (१) नाही.

राज्यात खनिज उत्खननामुळे बाधित होणाऱ्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खाण बाधीत क्षेत्राच्या विकासाकरिता प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी शासन अधिसूचना दि.०१.०९.२०१६ अन्वये जिल्हा खनिज प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली आहे. प्रमुख खनिजांच्या ३० टक्के तर गौण खनिजांच्या १० टक्के रॉयल्टी जिल्हा खनिज प्रतिष्ठामध्ये जमा करण्यात येतो.

सन २०१५-१६ ते माहे नोव्हेंबर २०२३ पर्यंत राज्यातील सर्व जिल्हा खनिज प्रतिष्ठानमध्ये रू.४९३९.९३ कोटी खनिज विकास निधी जमा झाला असून, आतापर्यंत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खाण बाधीत क्षेत्राच्या विकासाकरिता प्रधानमंत्री खनिज कल्याण क्षेत्र योजनेअंतर्गत विविध विकास कामांना रू.२४५८.६१ कोटी निधी मंजूर करण्यात येतो.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

---

## राज्याचे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे तत्कालिन संचालक यांची फौजदारी चौकशी करण्याबाबत

**(३०) ६९४१० (३१-०८-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे तत्कालिन संचालक, श्री.आंबेकर यांच्या कार्यकाळातील ई-ग्रंथालयाची निर्मिती, मिडीया मॉनेटरींग सेंटरची निर्मिती मिडिया मॉनेटरिंग सेंटरची निर्मिती व कामकाज, प्रशिक्षण दौरे व कार्यशाळा, संवादकारी स्टुडिओचे अद्ययावतीकरण इत्यादींचे नस्त्या व कागदपत्रे गहाळ झाली असल्याचे व उपलब्ध नस्त्यांमध्ये प्रशासकीय व वित्तीय अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच एस.टी.महामंडळाच्या दोन कंत्राटदारांनी जाहिरातीमध्ये केलेल्या गैरप्रकरणी तसेच शासनाच्या परवानगीशिवाय बेसिल कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.अजय आंबेकर यांचेविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करुन चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, नागपूर यांनी दिनांक ३० सप्टेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन मा. गृहमंत्री यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनावर तत्कालीन मा. गृह मंत्री यांनी कार्यवाहीचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अद्यापपर्यंत श्री. अजय आंबेकर यांचेवर कोणतीच कारवाई करण्यात आलले नसल्याने याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०३-२०२४) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे. नमूद करण्यात आलेल्या नस्त्यांपैकी केवळ संवादकारी स्टुडिओ अद्यावतीकरणाची नस्ती माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात आढळून आलेली नाही. तसेच, उपलब्ध नस्त्यांमध्ये प्रशासकीय व वित्तीय अनियमितता निदर्शनास आलेली नाही.

(२) हे खरे नाही. मे.बेसिल संस्था ही केंद्र सरकारच्या माहिती व नभोवणी मंत्रालया अंतर्गत कार्यरत मिनीरत्न संस्था आहे. सदर संस्था केंद्र शासन व त्या अधिपत्याखालील कार्यालये, तसेच, अनेक राज्याच्या विविध मिडीया मॉनिटरींगचे कामकाज करते.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.
(५) काही मुद्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ खाली संबंधिताविरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूरमधील मिहान प्रकल्पात ६ कंपन्यांनी बांधकाम करण्यास केलेला विलंब

**(३१) ६९९७६ (३१-०८-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूरमधील मिहान प्रकल्पातील एकूण १४ कंपन्यांपैकी ६ कंपन्यांनी त्यांच्याकडील २१० एकर जमीनीवर आजमितीस १० वर्षांहून अधिक कालावधी लोटला असला तरी बांधकाम केले नसल्याचे दिनांक ९ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने नागपूरमधील मिहान प्रकल्पात तब्बल १० वर्षे बांधकाम करण्यात दिरंगाई करणाऱ्या ६ कंपन्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.
यासंदर्भात दि.९ जून, २०२३ रोजी स्थानिक वृत्तपत्रात एक बातमी प्रसिद्ध झाली होती व त्यामध्ये ६ कंपन्यांची नावे समाविष्ट केली होती.
(२) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या भुखंड आवंटन व विकास याबाबतच्या शासनमान्य धोरणानुसार विहित मुदतीत भुखंडाचा विकास न करणाऱ्या आस्थापनांबाबत नियमित आढावा घेऊन कार्यवाही केली जाते. त्यानुसार सदर ६ कंपन्याबाबतची कार्यवाही महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली जिल्हयात विमानतळ उभारण्याबाबत

**(३२) ७००२९ (३१-०८-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील विकासाला गती मिळावी यासाठी सांगली जिल्हयात विमानतळ उभारण्याची वारंवार मागणी होत आहे, त्याच अनुषंगाने सांगली आणि जतमध्ये विमानतळाच्या प्रस्तावाची सन १९४६ मधील कागदपत्रे मिळाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगली जिल्हयातील विकासाला चालना मिळावी यासाठी शासनाने चौकशी करुन उपरोक्त ठिकाणी विमानतळ उभारणीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०२-२०२४) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
तथापि, सांगली आणि जतमध्ये विमानतळाच्या प्रस्तावाची सन १९४६ मधील कागदपत्रे विभागाच्या अभिलेखामध्ये आढळून आलेली नाहीत.

(२) सदर विमानतळाच्या सर्वेक्षणाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांचेकडून सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चाकूर (जि.लातूर) नगरपंचायतीतील मुख्याधिकारी व अभियंता यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३३) ७००९४ (०४-०९-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाकूर (जि.लातूर) नगरपंचायतीतील मुख्याधिकारी व एका अभियंत्याने त्यांच्या प्रशासकीय कार्यकाळात जमीनी खरेदीत व साहित्य खरेदीत तसेच चाकूर शहरात वृक्षारोपण न करता त्याचे देयक दिल्याच्या कामाची चौकशी करण्याबाबतची मागणी माजी नगराध्यक्ष तथा तेथील नगरसेवकांनी माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) चाकूर नगरपंचायत अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया केंद्र उभारणीसाठी चाकूर नगरपंचायत लगत चापोली ग्रामपंचायत क्षेत्रातील गट क्र.६३५ शंकरवाडी शिवारात १.६५ हे.आर. जमीन खरेदी करण्यात आली. याकरीता खाजगी वाटाघाटीद्वारे विहित प्रक्रिया राबवून महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व ग्राममंचायत चापोली यांची ना-हरकत घेण्यात आली. सदर जमीन ही वर्ग-२ ची असून या जिरायती जमिनीच्या थेट खरेदीसाठी नगररचनाकार यांनी रु.७,५७,९८८/- प्रति हे.आर. इतका दर प्रस्तावित केला. त्यानुसार जिल्हाधिकारी, लातूर यांच्या प्रशासकीय मान्यतेने रु.६४,४१,००२/- इतक्या किंमतीला जमीन खरेदी करण्यात आली आहे.
साहित्य खरेदी व वृक्षारोपण प्रकरणी कोणतीही चौकशी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रस्तावित नाही.
साहित्य खरेदीबाबत वार्षिक निविदा / दरपत्रक प्रसिद्ध करुन न्युनतम दराच्या निविदा धारकास कामाचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार साहित्य पुरवठा करण्यात आला असून, तद्नंतर निविदाधारकास देयक अदा करण्यात आले आहे. तसेच चाकूर शहरामध्ये विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यासाठी ई-निविदा/दरपत्रक प्रक्रिया राबवून झालेल्या कामाचे मोजमाप पुस्तिकेत नोंद घेण्यात आली असून, त्यानुसार निविदाधारकास देयक अदा करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगणा (जि.नागपूर) येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये शुध्दीकरण व जल शित उपकरणे संयंत्र (आरो वॉटर सिस्टम) बसविण्याबाबत

**(३४) ७०२१३ (०१-०९-२०२३). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणा (जि.नागपूर) येथील प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना अंतर्गत जिल्हापरिषद शाळांचे डिजिटलायझेशन करणेकरिता निधी मंजूर करणेबाबत तसेच सदर शाळांमध्ये जल शुध्दीकरण व जल शित उपकरणे संयंत्र (आरो वॉटर सिस्टम) बसविण्याकरिता जिल्हाधिकारी, नागपूर यांना लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कार्यवाही करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०२४) :** (१) होय.
(२) नागपूर जिल्हातील हिंगणा तालुक्यातील जिल्हा परिषद, शाळातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने शाळांमध्ये जलशुध्दीकरण व जलशित उपकरणे संयंत्र (आरो वॉटर सिस्टम) बसविण्याकरीता रु. १,५०,००,०००/- च्या प्रस्ताव सादर करण्यात आला असून जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या आराखडामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०२२ नुसार नियामक परिषदेवरील सदस्यांची समिती गठीत झालेली आहे. त्यानुसार दिनांक १२/०५/२०२३ रोजी मा. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूरची बैठक घेण्यात आली असून सदर प्रस्ताव सभेमध्ये ठेवण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दारणा (जि.नाशिक) नदीपात्र प्रदुषित करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३५) ७०२४४ (३१-०८-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील दारणा नदीपात्रात अस्वली-नांदगाव-बुद्रुकला जोडणाऱ्या पुलावरुन घातक रसायन पाण्यात टाकले जात असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जायकवाडी धरण व नाशिक शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुकणे धरणात गोंदे, वाडीवऱ्हे भागातील कंपन्यांचे रसायन टाकले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रसायनयुक्त पाण्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतजमिनी नापिक होण्याचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषी आढळून आलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्नाधिन घटनेच्या अनुषंगाने वाडीव-हे पोलीस ठाणे, ता.इगतपुरी, जि. नाशिक येथे भादंवि कलम २७७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, इगतपुरी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये मा. न्यायालयाने आरोपीस दोषसिद्ध ठरवून रक्कम रुपये ५००/- (अक्षरी पाचशे रुपये) इतका दंड व १५ दिवसांच्या साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मे. श्री सर्कल्स कॉंट्रॅक्टर्स या कंपनीची सिडकोकडे असलेल्या थकबाकीबाबत

**(३६) ७०७७९ (३१-०८-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री.विजय जैस्वाल या कॅन्सर पीडिताच्या मे.श्री सर्कल्स कॉंट्रॅक्टर्स या कंपनीच्या कामाची सिडकोकडे जवळपास १५ कोटी मूळ प्रलंबित रक्कम त्यांना देण्याबाबत शासनाने दिनांक ११ मार्च, २००४ रोजी निर्देश दिल्यानंतरही सिडकोकडून आजतागायत कार्यवाही झालेली नसल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९८९-९० मध्ये विविध १६ प्रकरणे व पाताळगंगा नदीवरील पुलाचे बांधकाम यातील १५ कोटी मूळ रक्कम देण्यात सिडकोने दिरंगाई केल्यामुळे जवळपास २५ वर्षांचे नियमानुसार येणारे व्याज मिळून ३१ मार्च, २०१३ रोजीपर्यंत मे.श्री सर्कल्स कॉंट्रॅक्टर्स या कंपनीच्या म्हणण्यानुसार ४९८ कोटी देय आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सिडको कॅन्सर पीडित श्री.विजय जैस्वाल यांना त्यांची प्रलंबित मूळ रक्कम त्यावरील व्याजासह परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, मे.श्री सर्कल्स कॉंट्रॅक्टर्स या कंपनीला १५ कोटी मूळ रक्कम देण्यात सिडकोने दिरंगाई केल्यामुळे शासनाच्या नुकसानीस जबाबदार असणाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०२-२०२४) :** (१), (२) व (३) मे.श्री सर्कल यांनी नवी मुंबईत केलेल्या सन १९८९ ते १९९६ या कालावधीतील १५ वेगवेगळी कंत्राटी कामे व फेब्रुवारी, १९९५ मधील हेटवणे पाणी पुरवठा योजनेंतर्गत बाळगंगा आणि पाताळगंगा नद्यांवरील पुलाचे बांधकाम इ. कामे केली आहेत. सदरच्या १५ कामांसाठी रु.२३८.६८ लक्ष व उक्त पुल बांधकामासाठी रु.३७४.३० लक्ष दावा केला होता. सदरचे दावे कराराच्या सामान्य अट (GCC) क्र. ८३ (१५ कामांसाठी) व क्र. ५० (पुलांच्या बांधकामासाठी) नुसार योग्य नसल्याने प्रकरण विवाद निवारण समितीकडे पाठविण्यात आले. सदर समितीने दि.२८.२.२०१७ रोजी सदरचे दावे निकाली काढून मे.श्री सर्कल यांना अदा केलेली रक्कम एजन्सीच्या सर्व दाव्यांसाठी अंतिम असल्याचा निष्कर्ष काढला. समितीचा निर्णय दि.२४.४.२०१७ रोजी एजन्सीला कळविण्यात आला असून उक्त कार्यवाहीस सिडको संचालक मंडळाने ठराव क्र.११८६५, दि.२.६.२०१७ अन्वये मान्यता दिली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बीड शहरातील सर्व्हे नं.३५ मधील तरफ गिराम येथील चुकीच्या पद्धतीने मंजुर झालेला तात्पुरता भुमी अभिन्यास नियमोचीत रद्द करण्याबाबत

**(३७) ७१५४४ (१२-०९-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड शहर अंतर्गत सर्व्हे नं.३५ मधील तरफ गिराम येथील बागलाने व इतर यांनी नगर परिषद, बीड येथील न.प.जा.क्र.३८७७, दि.३१.०५.२०२२ यानुसार तालुका उपअधिक्षक भुमिअभिलेख, बीड यांना सिमांकनासाठी देण्यात आलेला आहे व सदरील दोन्ही कार्यालयाने त्यासाठी मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दि.२७.०५.२०२२ रोजी श्री.गुट्टे, तत्कालीन मुख्याधिकारी, न.प.बीड यांची रितसर बाहेर जिल्ह्यात बदली झाल्यानंतर दि.३१.०५.२०२२ रोजी न.प.जा.क्र.३८७७ नुसार बागलाने व इतर यांना चुकीच्या पद्धतीने अनियमिततेला धरून बेकायदेशीररित्या बनावट तात्पुरता भुमी अभिन्यासास मंजुरी दिल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बागलाने, जोगदंड व इतर यांनी सर्व्हे नं.३५ मधील जमिनीचे खरेदी खताच्या आधारे ओपनस्पेससाठी व रस्त्यासाठी सोडलेल्या जमिनीची खरेदी करून घेवून ले-आऊट मंजुरीसाठी तत्कालीन मुख्याधिकारी न.प.बीड यांच्याकडे देण्यात आलेले असून, त्यास नगरपरिषद प्रशासनाने त्यास मंजुरी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यातच शेटे, लुणावत हे बागलाने व इतर यांच्या अगोदरचे रितसर खरेदीदार असून, सदरील सर्व्हे नं.३५ मध्ये काही नागरिकांनी मा.कोर्टामध्ये देखिल उचीत याचिका दाखल केलेली आहे. त्यानुषंगाने मा.कोर्टाने निर्णय देतांना शेटे व लुणावत यांच्याकडील जमिनी विकत घेणाऱ्यांकडे मालकी हक्क असल्याचे दिसून आले आहे,
(५) असल्यास, या सर्व बाबी लक्षात घेवून उपरोक्त व्यक्तींनी बहुतांश नागरिकांवर दाबदडप, अन्याय करुन बागलाने व इतर यांचा तत्कालीन मुख्याधिकारी, नगरपरिषद बीड यांनी उपरोक्त आदेश पारीत केलेला आहे हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदरील चुकीच्या झालेल्या सर्व्हे नं.३५ संचिकेला रद्द करणे बाबत व झालेला प्रकार शासनाच्या प्रचलित नियमांना डावलुन झाल्यामुळे सदरील अनियमिततेची स्तरनिहाय चौकशी व संबंधितावर कार्यवाही करण्याची मागणी शासनाकडे मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे केलेली आहे हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशतः खरे आहे,

तत्कालीन मुख्याधिकारी डॉ.उत्कर्ष गुट्टे यांची दि. २७ मे, २०२२ रोजी बदली करण्यात आली आहे. त्यानंतर श्री.उमेश ढाकणे हे दि.३० मे, २०२२ रोजी मध्यान्न पूर्व बीड नगरपरिषद येथे मुख्याधिकारी या पदावर रुजू झाले. तथापि, नगरपरिषदेच्या जा.क्र.३८७७, दि.३१ मे, २०२२ नुसार तत्कालीन मुख्याधिकारी डॉ.उत्कर्ष गुट्टे यांनी तात्पुरता भुमीअभिन्यास मंजूर केला असल्याचे उपलब्ध दस्तऐवजावरुन निदर्शनास येते.
(३) हे खरे नाही.
(४) सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(५), (६) व (७) बीड नगरपरिषदेअंतर्गत सर्व्हे क्र.३५ मधील अभिन्यास रद्द करण्याबाबतच्या कार्यवाहीस दिलेली स्थगिती दि.१४ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये उठविण्यात आली आहे. तसेच सदर प्रकरणी दि.०४ ऑक्टोबर, २०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यासाठी दिलेल्या आदेशास मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांच्या दि.११ ऑक्टोबर, २०२३, दि.१३ ऑक्टोबर, २०२३ व दि.१७ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या आदेशान्वये स्थगिती देण्यात आली आहे. सद्यस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरालगत असलेल्या गावांचा महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत

**(३८) ७१६०३ (०१-११-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) उद्योगनगरी शहरालगतच्या गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजवडी, मान, नेरे आणि सांगवडे या सात गावांचा महानगरपालिकेच्या हद्दीत समावेश करण्याबाबतचा महानगरपालिकेचा ठराव दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ मध्ये करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरालगतच्या सात गावांचा समावेश पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत करण्याबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दिनांक ३ जून, २०१५ रोजी मंजुरीकरिता शासनाकडे पाठवण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरालगतच्या सदर सात गावात झपाट्याने नागरिकीकरण होत असल्याने सदरहू गावांमध्ये कचरा, ड्रेनेज, पाणी इत्यादी समस्या निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त गावांचा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत समावेश करण्याचा आठ वर्षापासून प्रलंबित असलेला प्रस्ताव तातडीने मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर गावांमधून अंदजे १० टन घनकचरा व ३० लाख लिटर सांडपाणी प्रतिदिन निर्माण होणार आहे.

(४) व (५) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची प्रारूप विकास योजना प्रसिध्द करण्यात आली असून प्रारूप विकास योजनेमध्ये मौजे गहुंजे, जांबे, हिंजवडी, माण, नेरे व सांगवडे हे गाव हिंजवडी नागरी विकास केंद्रामध्ये समाविष्ट असून सदर गावामध्ये तसेच संपुर्ण हिंजवडी नागरी विकास केंद्रामध्ये नियोजनाच्या दृष्टीने आवश्यक अशा मूलभूत सोयीसुविधांची आरक्षणे, रस्त्याचे जाळे व प्रस्तावित लोकसंख्या घनतेनुसार विकासाचा कल व विकसन क्षमता विचारात घेऊन आवश्यक रहिवास, वाणिज्य, औद्योगिक इ. वापर विभाग प्रस्तावित आहेत.

सदर गावे महानगरपालिका हद्दीत समावेश करण्याबाबतच्या महानगरपालिकेच्या प्रस्तावाबाबत माहिती मागविण्यात आली आहे.

---

## राज्यात केंद्र शासन पुरस्कृत "पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी" योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत

**(३९) ७२७५० (११-०२-२०२४). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने विविध पथविक्रेत्यांना रु.१०,०००/- पर्यंतचे खेळते भांडवली कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी "पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी" योजनेतंर्गत "स्वनिधी से समृध्दी" कार्यक्रम राज्यात राबविण्यासाठी राज्यातील ३०१ शहरांमधील महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेतंर्गत समावेश करण्यात आलेल्या बऱ्याच शहरांमध्ये योजनेची अंमलबजावणी करण्यात आली नसून याकडे सनियंत्रण यंत्रणेचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र राज्य मागे असून देशात राज्याचा सहावा क्रमांक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०२४) :** (१) होय हे खरे आहे.

पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेतंर्गत "स्वनिधी से समृध्दी" कार्यक्रम राज्यात दि.१५.०२.२०२१ पासून सुरु करण्यात आला असून राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रांतील ३०१ शहरांचा समावेश स्वनिधी से समृध्दी कार्यक्रमात करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही,

पीएमस्वनिधी योजनेची प्रभावी अंमलबजावणी केल्यामुळे सप्टेंबर २०२३ या महिन्यामध्ये ४,९७,२८१ प्रथम कर्ज प्राप्त पथविक्रेते होते ते नोव्हेंबर २०२३, अखेर ६,६५,५९० इतक्या पथविक्रेत्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. त्यामुळे सदर पथविक्रेते स्वनिधी से समृध्दी योजनेचे लाभार्थी बनल्यामुळे त्यांचे सामाजिक आर्थिक प्रोफाईलिंग व योजनेचा लाभ देण्याचे उद्दिष्टांमध्ये वाढ झालेली आहे. तरी सुध्दा उपरोक्त प्रमाणे उद्दिष्ट साध्य झालेले आहे.

(४) सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरावरुन दर महिन्याला महानगरपालिका व जिल्हा सह आयुक्त कार्यालय यांचा आढावा घेण्यात येतो.

सामाजिक आर्थिक प्रोफाईलिंग करण्यात आलेल्या पथविक्रेत्यांना ८ योजनेचा लाभ देण्यासाठी दर महिन्याला कॅम्पचे आयोजन करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे-डोंबिवली जोडणारा माणकोली उड्डाणपूलाचे काम अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याबाबत

**(४०) ७३८५१ (१५-०२-२०२४). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-डोंबिवली हे अंतर कमी मिनिटास पार करण्यासाठी माणकोली उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात असून काही किरकोळ कामे पुर्ण करण्यास दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे ठाणे व डोंबिवली शहरात वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होत असून माणकोली उड्डाणपूल तयार झाला तर सदर कोंडीतून मोठा दिलासा तेथील प्रवाशांना मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने माणकोली उड्डाणपूलाचे काम सत्वर पूर्ण करुन नागरिकांना उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०३-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) पुलाचे लोड परीक्षण व इतर संलग्न कामे अंतिम टप्प्यात आहेत. ही कामे पुढील काही दिवसांत पूर्ण होणे अपेक्षित आहे. तदनंतर माणकोली ते मोठागाव पुल वाहतुकीस खुला करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नेकनूर (ता.जि.बीड) येथील प्रस्तावित नगरपंचायतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत

**(४१) ७४२८९ (०८-१२-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेकनूर (ता.जि.बीड) येथील ग्रामपंचायतीला नगरपंचायतचा दर्जा देण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडून प्रस्ताव तयार करण्यात आला असता, उक्त प्रस्तावातील मुद्दा.क्र.४ व मुद्दा.क्र.५ मध्ये त्रुटी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायत कार्यालय, नेकनूर यांनी सदर त्रुटींची दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ रोजी पूर्तता करुन आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव जिल्हा सहआयुक्त, नगरपालिका प्रशासन विभाग, बीड यांना सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नेकनूर येथील ग्रामपंचायतला नगरपंचायतचा दर्जा देण्याबाबत त्रुटींची पूर्तता झाल्याने सदर प्रस्ताव मंजुरीसाठी शासनास सादर करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक १९ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी प्रस्ताव शासनास सादर करून मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०२-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी नेकनूर ग्रामपंचायतीचे नगरपंचायत मध्ये रुपांतर न करण्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने वस्तुनिष्ट अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना विभागाच्या दि.०२ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी अहवाल सादर करण्याबाबत तहसीलदार व गट विकास अधिकारी, ता.जि.बीड यांना दि.२९ डिसेंबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले असून, जिल्हाधिकारी, बीड यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव विमानतळाला "आद्यकवी रामायणकार महर्षी वाल्मिक ऋषींचे" नाव देण्याबाबत**

**(४२) ७५६२५ (०८-०२-२०२४). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव विमानतळाला "आद्यकवी रामायणकार महर्षी वाल्मिक ऋषींचे" नाव देण्यात यावे याकरीता केंद्र शासनाकडे शिफारस करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे फेबुवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) जळगाव विमानतळाचे नामकरण "महर्षी वाल्मिक ऋषी विमानतळ" करण्यासाठीच्या मागणीवर शासनाने अवलोकन केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील आचार्य आनंद ऋषीजी चौकात होत असलेली वाहतूक कोंडी**

**(४३) ७५९७७ (१७-०२-२०२४). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठासमोरील आचार्य आनंद ऋषीजी चौकात मेट्रोच्या कामामुळे वाहतूक कोंडीत भर पडली असून, नजिकच्या काळात सुरू होणाऱ्या उड्डाणपुलाच्या कामामुळे वाहतूक सहजतेने सुरू राहावी यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याची बाब दिनांक ६ ऑक्टोंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चौकातून दररोज तीन लाख वाहने ये-जा करीत असताना, पोलीसांसह वॉर्डन मिळून केवळ १४ कर्मचारी कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वाहतूक कोंडी कमी करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो प्रकल्प व विद्यापीठ चौकातील एकात्मिक दुमजली उड्डाणपुलाचे बांधकाम करतेवेळी वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक पोलीस विभागास सहकार्य म्हणून मेट्रो कंत्राटदार मे.टाटा प्रोजेक्टस लि. यांच्यामार्फत वाहतूक पोलीस विभागास सद्यस्थितीत २६८ ट्राफिक वॉर्डन उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

(३) प्राधिकरणामार्फत मेट्रो व एकात्मिक दुमजली उड्डाणपूल बांधकाम कालावधी अस्तित्वातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी पर्यायी रस्त्यांचा सविस्तर अभ्यास करुन वाहतूक आराखडा निश्चित करण्यात आला आहे. सदर आराखड्यामधील निश्चित केलेल्या उपाययोजनांनुसार वाहतूक पोलीस विभागामार्फत वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कंत्राटी भरतीमध्ये सेवानिवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी यांच्या नेमणुका केल्याबाबत

**(४४) ७६४१० (१७-०२-२०२४). ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कंत्राटी भरतीमध्ये वर्तमानपत्रामध्ये जाहीरात न देता व मुलाखत न घेता शासकीय व निमशासकीय कार्यालयातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी यांच्या नेमणुका करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन निर्णय दिनांक १४ जानेवारी, २०१० व दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तींचे पालन करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केलेली आहे ,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सुशिक्षित बेरोजगारांना अशा कंत्राटी भरतीमध्ये प्राधान्याने नियुक्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०२-२०२४) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

दि.२९/०८/२०१८ रोजी झालेल्या कार्यकारी समितीची सभा क्र.४ मधील ठराव क्र.४ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील वेगवेगळया विभागातील प्रकल्पासाठी विवक्षित कामांकरिता अनुभवी/तज्ञ सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांना शासन निर्णय दि. १७/१२/२०१६ च्या तरतूदीनुसार करार पद्धतीने वेळोवेळी नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. तथापि दि. १४/०१/२०१० च्या शासन निर्णयातील अटीचे पालन न झाल्याचे निदर्शनास आल्याने दि. १९/१०/२०२३ रोजी एकूण १२ सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयाच्या विविध संवर्गातील ४०७ पदांचे आकृतीबंधास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने सेवा प्रवेश नियम तयार करण्यात येत असून सेवाप्रवेश नियम तयार झाल्यानंतर भरती प्रक्रियेचा अवलंब करून सक्षम प्राधिकरणामार्फत रिक्त पदांवर उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उल्हासनगर (जि.ठाणे) शहरातील शांतीनगर मुख्य प्रवेशद्वार ते साईबाबा मंदिरपर्यंत (राज्य महामार्ग क्र ७६) उड्डाणपूल उभारण्याबाबत

**(४५) ७६५४५ (१७-०२-२०२४). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहरातील कल्याण-अंबरनाथ रस्ता हा उल्हासनगर शहरात प्रवेश करणारा मुख्य रस्ता असून वाढते शहरीकरण, दिवंसेदिवस वाढती संख्या लक्षात घेता सदर रस्त्यावर उड्डाणपूल बांधण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे केली असून त्यानुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महानगरपालिका यांना दिनांक ८ जून, २०२३ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावर उड्डाणपूल बांधल्यास शहराच्या बाहेरून येणाऱ्या वाहनांची गर्दी कमी होण्यास मदत होणार असून या बाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी आपल्या पत्राद्वारे दिनांक ४ सप्टेंबर, २०२३ रोजी अधीक्षक अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे परिपूर्ण प्रस्ताव पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हासनगर महानगरपालिकेने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठविलेल्या प्रस्तावास मान्यता द्यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २७ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०२४) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) उल्हासनगर महानगरपालिकेने कल्याण अंबरनाथ रस्त्यावरील शांतिनगर मुख्य प्रवेशद्वार ते साईबाबा मंदीर पर्यंत उड्डाणपुल बांधण्याबाबतचा प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे सादर केला आहे. तथापि, प्राधिकरणाच्या नियोजन विभागाच्या सन २०१७ च्या सर्वसमावेशक वाहतुक अभ्यास (CTS) नुसार सदयस्थितीत अस्तित्वात असलेला २+२ लेनचा रस्ता वाहतुकीसाठी पुरेसा आहे. तथापि, भविष्यात उल्हासनगर शहरामधील विकास व वाहतुकीतील वाढ लक्षात घेता, प्राधिकरणामार्फत सल्लागार नेमणूक करुन वाहतुक अभ्यास व सुसाध्यता अहवाल तयार करुन पुढील कार्यवाही करण्याचे प्राधिकरणाच्या स्तरावर प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे येथील मोघरपाडा येथील प्रस्तावित असलेल्या मेट्रो आगाराच्या भूसंपादन व खाजगी कंपनीला ९०५ कोटी रुपयांचे कंत्राट देण्यात आल्याबाबत**

**(४६) ७६६५३ (१७-०२-२०२४). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोघरपाडा (जि.ठाणे) येथील प्रस्तावित असलेल्या मेट्रो आगाराच्या भूसंपादन व जमिनीचा मोबदला निश्चित झाला नसतांनाही तसेच ठाणे जिल्हाधिकारी यांच्याकडून मेट्रो आगाराच्या जमिनीचा प्रस्ताव तयार केलेला नसतांनाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये काढलेल्या निविदेनुसार एसईडब्लू आणि व्हीएसई या संयुक्त कंपनीला ९०५ कोटी रुपयांचे कंत्राट देण्यात आल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुलुंड अग्निशमन केंद्र ते गायमुख स्थानक या १६ कि.मी.च्या प्रस्तावित मार्गिकेतील रेल्वेमार्गाच्या आरेखन, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी व मार्ग सुरु करण्याच्या कामाकरिता निविदेपेक्षा ७.२९ टक्के कमी निविदा असलेल्या मेसर्स अपूर्वक्रिती इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीच्या १२१ कोटी ५५ लाख ९१ हजार ३४९ रुपयांच्या निविदेस मंजूरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०३-२०२४) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

मेट्रो क्र.४, ४ अ, १० व ११ करीता मोघरपाडा येथे एकात्मिक कारशेड उभारणीबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. यासाठी प्राधिकरणाने स्थापत्य कामासाठी राज्य दरसूची २०२१-२२ व बृहन्मुंबई महानगरपालिका दरसूची २०१८ च्या आधारीत दरावर रु.७११.३४ कोटी चे सल्लागाराने तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. मे. एसईडब्लू-व्ही एसई यांच्या संयुक्त कंपनीने सन २०२३ च्या दरसूचीवर आधारीत दरावर रु.९०५ कोटी (सर्व करांसहीत) रक्कमेच्या लघूत्तम निविदा स्विकारण्यात आली. सदरची निविदा सन २०२३ च्या दरसूची नुसार (-)०.०३५% इतक्याने कमी आहे.

तसेच मेट्रो ४ व ४ अ चे काम प्रगतीत असल्याने मुलुंड (अग्निशमन स्थानक) ते गायमुख स्थानक दरम्यान गिट्टीरहीत रेल्वेमार्ग टाकण्याकरीता निविदा प्रसिध्द करण्यात आली. मे.अपुर्व क्रिती इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची लघुत्तम रु.१२१,५५,९१,३४९/- (GST वगळून) अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा ०७.२९% कमी रक्कमेची निविदा स्विकारण्यात आली आहे. नियोजित लक्ष्यानुसार सर्व मेट्रो मार्गाचे कामकाज विहीत वेळेत सुनिश्चित करण्यासाठी कारशेड व रोलींग स्टॉकसाठी स्टेबलिंगचे काम पुर्ण करण्याकरीता सदरच्या निविदा प्रक्रिया प्राधिकरणामार्फत पुर्ण करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक मेट्रो प्रकल्पास अंतिम मंजुरी न मिळल्याने प्रकल्प सुरु होण्यास होत असलेला विलंब

**(४७) ७६८१६ (१७-०२-२०२४). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगर प्रदेश क्षेत्रात सार्वजनिक जलद परिवहन व्यवस्था प्रकल्प (MRTS) अंतर्गत मेट्रो प्रकल्प राबविण्यास देण्याबाबत शासन निर्णय क्रमांक एमआरडी-३३१९/प्र.क्र.६८/ नवि-७ दि.०९ सप्टेंबर २०१९ रोजी मुख्य उन्नत मार्गिका ३३ कि.मी व २६ कि.मी लांबीच्या पूरक मार्गिका रु.२१००.६० कोटी किमतीच्या अंदाजपत्रकाच्या प्रकल्प राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक नियो मेट्रो प्रकल्प विहित वेळेत सुरु होत नसल्याने नाशिक शहरातील नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी असल्याची बाब निदर्शनासाठी आहे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील नियो मेट्रो प्रकल्प तातडीने मंजूर करून सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व अपर मुख्य सचिव (नवि-१) यांना दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील मागणीच्या अनुषंगाने नगर विकास विभाग यांनी क्रमांक-एनआरडीए-३३२३/उपमुमं१४/नवि-७, दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३ अन्वये मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन, नागपूर यांना तात्काळ कार्यवाही करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास,नाशिक मेट्रो नियो प्रकल्पास अंतिम मंजुरी मिळण्याबाबत व प्रकल्प सुरु करण्याबाबत मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन, नागपूर यांच्या मार्फत अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन नाशिक शहरातील मेट्रो निओ प्रकल्प सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०३-२०२४) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४), (५) व (६) होय, हे खरे आहे.

नाशिक मेट्रो निओ प्रकल्पाचा प्रस्ताव दि.०९.०९.२०१९ रोजी केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. गृहनिर्माण व शहरी कामकाज मंत्रालय, भारत सरकार आणि सर्व संबंधित मंत्रालयांकडून प्रस्तावाचे मूल्यांकन केल्यानंतर, सार्वजनिक गुंतवणूक मंडळाकडून (PIB) मंजुरीसाठी प्रस्ताव वित्त मंत्रालयाकडे पाठवण्यात आला होता.

सार्वजनिक गुंतवणूक मंडळाने (PIB) दिनांक २४.०३.२०२१ रोजी झालेल्या बैठकीत सदर प्रस्तावाला मान्यता दिली असून अंतिम मंजुरीसाठी कॅबिनेट सचिवालय आणि प्रधानमंत्री कार्यालयाकडे पाठवण्यात आला.

सदर प्रकल्प प्रस्तावाच्या आढावा घेण्यासाठी दिनांक १५.०२.२०२३ आणि १५.०३.२०२३ रोजी प्रधानमंत्री कार्यालय, आवास व शहरी कार्य मंत्रालय, रस्ते परिवहन आणि राजमार्ग मंत्रालय, रेल्वे बोर्ड, महामेट्रो आणि नाशिक महानगरपालिका अधिकाऱ्यांसह संयुक्त बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये पंतप्रधान कार्यालयाने केलेल्या सुचना विचारात घेऊन महामेट्रोद्वारे नाशिक मेट्रो निओ प्रकल्पाचा सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल शासनास सादर केला आहे. सदर सुधारित प्रस्तावास मान्यता देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

---

**मुंबईतील कांजूरमार्ग येथे मेट्रो ६ साठी कारशेड बांधण्याचा घेतलेला निर्णयाबाबत**

**(४८) ७७३९३ (१७-०२-२०२४). श्री.आदित्य ठाकरे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांजूरमार्ग येथे मेट्रो ६ साठी कारशेड बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेट्रो-३ व मेट्रो-४ साठी कारशेड उभारण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसताना मेट्रो-६ बाबत निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, मेट्रो-६ च्या कामासाठी ५०६ कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली असून उक्त कारशेड साठी अंदाजे किती खर्च करण्यात येणार आहे,

(४) तसेच, सदरहू कारशेडसाठी एकूण २२ हेक्टर जागेत उभारण्यात येणार असल्याने उर्वरित रिक्त जागेचा वापर कोणत्या कारणासाठी करण्यात येणार आहे याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कार्यवाही करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मेट्रो मार्ग क्र.३ करीता आरे येथे व मेट्रो मार्ग क्र.४ साठी मोगरपाडा येथे कारशेड उभारण्याचे नियोजन आहे. त्यानुसार शासनाने निर्णय घेतला आहे.

(३) व (४) सद्य:स्थितीत मेट्रो ६ च्या कारशेडच्या स्थापत्य कामासाठी व कर्मचारी वसाहती बांधकामासाठी सुमारे रु.५०८ कोटी एवढा व सल्लागारासाठी सुमारे रु.१७ कोटी एवढा खर्च अंदाजित आहे. तसेच सदर कांजूरमार्ग येथील कारशेडसाठी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दि.१७.०४.२०२३ रोजीच्या आदेशान्वये मौजे-कांजूर येथील १५ हेक्टर जागेचा आगाऊ ताबा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास दिला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मराठा समाजाला एसईबीसी–ईडब्ल्यूएस चा निकाल लागला नसल्याने नियुक्त्या प्रलंबित असल्याबाबत**

**(४९) ७८०६५ (०८-०२-२०२४). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठा समाजाला एसईबीसी–ईडब्ल्यूएस चा निकाल लागला नसल्याने नियुक्त्या प्रलंबित असल्याबाबतचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रलंबित असलेल्या निकालामुळे जवळपास ७३० हून अधिक पदांच्या नियुक्त्या रखडलेल्या असतांनाही शासनाने अदयापही दखल घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०३-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही. सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे स्थापत्य अभियांत्रिकी सेवा, कर सहायक व वन सेवेतील काही उमेदवारांनी दाखल केलेला मुळ अर्जावर महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दि.०२.०२.२०२३ रोजी दिलेल्या निकालान्वये दि.२३.१२.२०२० चा शासननिर्णय रद्द ठरविला आहे. त्या विरुध्द मा.उच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले आहे. तसेच संबंधित परीक्षांमधील उमेदवारांनी सुध्दा याचिका न्यायालयात दाखल केल्या होत्या. सदर प्रकरणी मा. महाधिवक्ता महाराष्ट्र राज्य तसेच विशेषसमुपदेशक यांच्या मार्फत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे शासनाची प्रभावी भूमिका मांडण्यात आली. सदर प्रकरणी अंतिम निर्णयार्थ मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दि.१८.१०.२०२३ ते दि.२.११.२०२३ या कालावधीपर्यंत नियमित सुनावणी घेण्यात आल्या व मा.उच्च न्यायालयाने दि.२२.१२.२०२३ रोजी शासनाच्या बाजूने अंतिम निर्णय दिला. सदर निकालानुसार विविध टप्प्यांवर प्रलंबित असलेल्या निवड प्रक्रियांतील उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**नागपूर मेट्रो रेल्वे कंत्राटी कर्मचारी संघाच्या विविध मागण्यांबाबत**

**(५०) ७८४४७ (१७-०२-२०२४). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर मेट्रो रेल्वे कंत्राटी कर्मचारी संघाच्या वतीने संविधान चौक येथे मागील काही दिवसापासून त्यांच्या विविध मागण्यासाठी आंदोलन सुरु केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांनी त्याच्या मागण्यासाठी संबंधित प्रशासनाकडे वारंवार निवेदन देऊनही त्यांची दखल न घेतल्याने त्यांनी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला असून, यासंदर्भात त्यांच्या विविध मागण्या पुर्ण करण्याबाबतचे निवेदन शासन संबंधित रेल्वे प्रशासनाला देणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विविध मागण्यांबाबत शासनाने रेल्वे प्रशासनाला निवेदन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०२-२०२४) :**(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

महामेट्रो मध्ये काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यासाठी दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग अधिनियम अंतर्गत लागू असलेली किमान वेतन लागू होते किंवा नाही, तसेच मेट्रोच्या कुशल व अकुशल कर्मचाऱ्यांकरीता वेगळी किमान वेतन श्रेणी सुचित करावी, अशी विनंती उद्योग, उर्जा व कामगार विभागास महामेट्रोमार्फत दि.२३.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आली आहे.

तसेच, अंतरिम वित्तीय मदत म्हणून महा मेट्रोमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रोत्साहन भत्यामध्ये दि.०१.१०.२०२३ पासून रु.१५०० ते रु.३००० ची वाढ महामेट्रो प्रशासनाने लागू केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.